**PRESS RELEASE**

RESERVE BANK OF INDIA

www.rbi.org.in
www.rbi.org.in\hindi
e-mail: helpprd@rbi.org.in

**PRESS RELATIONS DIVISION**, Central Office, Post Box 406, Mumbai 400001
Phone: 2266 0502 Fax: 2266 0358, 2270 3279

ऑगस्ट २३, २००५

**परकीय चलनामध्ये प्रदान करण्याचा आग्रह नको**

रिझर्व्ह बँकेच्या निर्देशनास आणून देण्यात आले आहे की हॉटेल इत्यादी सेवा देणारे काही सेवादाते, परदेशी नागरिकांना अमेरिकन डॉलरमध्ये वेगळे दर सांगतात व प्रदान परकीय चलनातच केले जावे असा आग्रह धरतात. ही पद्धत परदेशी चलन व्यवस्थापन कायदा (फेमा) १९९९ला धरुन नाही, तसेच ती भारताच्या अंतर्देशीय चलनाऱ्या वैधतेच्या दृष्टीनेही हानिकारक आहे.

पूर्वी परदेशी चलन नियमन कायदा १९७३ (फेरा)च्या अंतर्गत भारत सरकारने ऑगस्ट २०, १९८१ रोजी सूचनापत्र काढले होते, व त्यानुसार भारत भेटीस येणाऱ्या परदेशी पर्यटकांना प्रदान परदेशी चलनामध्ये करणे बंधनकारक होते. मात्र 'फेरा १९७३' आधीच रद्दबातल झालेला आहे. परदेशी चलनीविषयक प्रचलित नियमावली ही 'फेमा, १९९९' अंतर्गत करण्यास आली आहे, व तो जून १, २००० पासून अमलात आला आहे.

स्पष्ट करण्यात येत आहे, की 'फेमा' अंतर्गत रिझर्व्ह बँकेचे सूचनापत्र क्र. १६, दिनांक मे ३, २००० हे केवळ या साठीच तयार करण्यात आले आहे, की भारतातील निवासी व्यक्तींना भारताबाहेरील निवासी व्यक्तीकडून, ती व्यक्ती भारत भेटीस आलेली असताना, प्रदान परदेशी चलनामध्ये घेणे शक्य व्हावे. व्यवहारांच्या सोयीसाठी, यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की ज्या योगे परदेशी व्यक्तीला, तिला देण्यात आलेल्या सेवांबद्दलचे प्रदान भारतीय रुपयांमध्ये किंवा परदेशी चलनामध्ये करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. या मुळे भारतीय निवासी व्यक्तींना परकीय चलनामध्येच पैसे मागण्याचा आग्रह धरण्याचा अधिकार प्राप्त होत नाही.

सध्या अशी कोणतीही सूचना अमलात नाही, की ज्यामुळे अशा प्रकरणांमध्ये अनिवासी व्यक्तींना परदेशी चलनामध्ये प्रदान करणे बंधनकारक ठरावे. त्यामुळे, भारतामध्ये मिळालेल्या सेवांबद्दल परदेशी चलनामध्ये प्रदान मिळण्यासाठीचा आग्रह हा प्रचलित परदेशी चलनसंबंधीच्या नियमांना धरुन नाही.

**अजित प्रसाद**
व्यवस्थापक

**प्रेस रिलीझ – २००५-२००६ / २३८**